**प्रतिवादी क्र. १ तर्फे अतिरिक्त सरतपास – श्री.एस. आर. पोवार, वकील.**

**१०**. आता मला वादीच्या जन्माचा ग्रामपंचायतीने दिलेला दाखला दाखवला. सदर दाखल्यास वादीतर्फे निशाणी क्रमांक देण्यास आक्षेप घेण्यात आला आहे. सदर दाखला सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **नि. क्र.१३१** देण्यात येतो.

**वादी तर्फे उलटतपास – श्री. व्ही.एस. इंग्रोळे, वकील.**

**११**. माझे पाचवी पर्यंतचे पेरणोली गावातील केंद्रीय शाळेत शिक्षण झाले आहे. मी १९८७ साली शाळा सोडली आहे. वादीचे शिक्षण देखील गावातील शाळेत झाले आहे. माझे वडील २०२४ साली मयत झाले आहेत. वादी माझा सख्खा भाऊ असून तो देसाई घराण्यात दत्तक गेला आहे. मी लेखी कैफियत दाखल करण्या बाबत वकीलांना माहिती दिलेली नाही. या दाव्याला दाखल केलेली कैफियत माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे.

**१२.** मला वकीलांना कोणती कागदपत्रे दिली होती ते आता आठवत नाही. मी वकीलांना स्वतःचे व वादीचे ७/१२, ८/अ आणि खाते उतारे दिले होते. मी त्यांना वाटणीची कागदपत्रे दाखवली होती. मी वकीलांना खरेदीपत्राची प्रत दाखवली होती. आजही ती प्रत माझ्या ताब्यात आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो मुळ खरेदीपत्र त्याच्या ताब्यात नसून त्याच्याकडे नक्कल आहे. मी खरेदीपत्राची नक्कल मिळण्यासाठी कोठेही अर्ज केला नाही. मी दावा दाखल झाल्यानंतर स्टॅम्प व्हेंडरकडे नक्कल मिळण्याबाबत विचारण केली नाही.

**१३**. नाव नोंदण्यासाठी खरेदीपत्राचा अस्सल दस्त लागतो याची मला माहिती आहे. मी माझे नाव नोंदवताना खरेदीपत्राचा अस्सल दस्त हजर केला नव्हता. आता मला माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.२ मधील अधोरेखांकित भाग 'अ' वाचून दाखवला तो माझ्या लेखी कैफियत मध्ये नमूद नाही. मला सदर बाब माझ्या लेखी कैफियत मध्ये नमुद नसल्याचे कारण सांगता येणार नाही. (सदर बाबीस अधोरेखांकित भाग 'अ' करण्यास प्रतिवादी क्र.१ च्या वकीलांमार्फत सदर बाब स्पष्टीकरण स्वरूपातील असल्यामुळे आक्षेप घेण्यात आला आहे. लेखी कैफियतीसह सदर भागाचे वाचन केले असता त्यामध्ये विक्रीपत्र करून घेतल्याबाबतचा विशिष्ठ मजकूर नमूद असल्यामुळे

आक्षेप नाकारण्यात येतो.) मी आज माझ्या एकटयाच्या वतीने पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व इतर प्रतिवादी एकत्र रहातो.

**१४**. माझे रेशनकार्ड व आधार कार्ड आहे. मी ते न्यायालयात सादर करू शकतो. मी आधार कार्ड वरती माझी स्वतःची माहिती दिली आहे. माझ्या आधारकार्ड वरती १९७३ अशी माझ्या जन्मतारखेची नोंद आहे. माझ्या रेशनकार्डवरती माझ्यासह सर्व प्रतिवादींची नावे आहेत. आमच्या मध्ये वेगवेगळे रेशनकार्ड झालेले नाहीत. माझ्या कैफियतीमध्ये आम्ही सर्व प्रतिवादी वेगळे रहात असल्याचा उल्लेख नाही. मी वादीने या दाव्यात दाखल केलेला माझा शाळेचा जन्म दाखला पाहिलेला आहे. त्यातील माझ्या जन्म तारखे व्यतिरिक्तचा इतर मजकूर बरोबर आहे.

**१५**. आता मला माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.३ व ४ मधील अधोरेखांकित भाग 'ब' आणि 'क', वाचून दाखवले ते माझ्या लेखी कैफियत मध्ये नमूद नाहीत. मला सदर बाब माझ्या लेखी कैफियत मध्ये नमुद नसल्याचे कारण सांगता येणार नाही. (सदर बाबीस अधोरेखांकित भाग 'ब' आणि 'क' करण्यास प्रतिवादी क्र.१ च्या वकीलांमार्फत सदर बाब स्पष्टीकरण स्वरूपातील असल्यामुळे आक्षेप घेण्यात आला आहे. लेखी कैफियतीसह सदर भागाचे वाचन केले असता त्यामध्ये विक्रीपत्र करून घेतल्याबाबतचा विशिष्ठ मजकूर नमूद असल्यामुळे आक्षेप नाकारण्यात येतो.)

**१६.** आता मला माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.५ मधील अधोरेखांकित भाग 'ड' आणि 'इ', परिच्छेद क्र. ८ मधील अधोरेखांकित भाग 'ई' वाचून दाखवला तो माझ्या लेखी कैफियत मध्ये नमूद नाही. मला सदर बाब माझ्या लेखी कैफियत मध्ये नमुद नसल्याचे कारण सांगता येणार नाही. (सदर बाबीस अधोरेखांकित भाग 'ड', 'इ' आणि 'ई' करण्यास प्रतिवादी क्र.१ च्या वकीलांमार्फत सदर बाब स्पष्टीकरण स्वरूपातील असल्यामुळे आक्षेप घेण्यात आला आहे. लेखी कैफियतीसह सदर भागाचे वाचन केले असता त्यामध्ये विक्रीपत्र करून घेतल्याबाबतचा विशिष्ठ मजकूर नमूद असल्यामुळे आक्षेप नाकारण्यात येतो.)

**१७**. मी खरेदीपत्राचा दस्त लेखक लतिफ आणि साक्षीदार दत्तात्रय निवृत्ती देसाई,

दत्तात्रय ज्ञानोबा सावंत यांची साक्ष नोंदवणार आहे. महादेव हरमळकर मयत आहेत.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, वादी तीन वर्षे वयाचा असताना दत्तक गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, वादी दत्तक गेला त्यावेळी माझा जन्म झाला नव्हता. आमच्यामध्ये वादी हा माझा मोठा भाऊ आहे. त्याच्यानंतर माझा जन्म झालेला आहे. माझ्यानंतर मंगलचा एक वर्षाने जन्म झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी माझा व मंगलचा एक–एक वर्षाच्या अंतराने जन्म झाल्याचे खोटे सांगत आहे. माझा व प्रतिवादी क्र.३ चा व्यवस्थित संसार चालू आहे. प्रतिवादी क्र.४ चे बी.कॉम पर्यंतचे शिक्षण झालेले असून तो मागिल दोन वर्षापासून पुणे येथे नोकरी करत आहे. त्याचे लग्न झालेले नाही. प्रतिवादी क्र.४ त्याच्या वयाच्या १८ ते २० वर्षापर्यंत आमच्या सोबत एकत्र रहात होता. प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.४ चे शिक्षण केले आहे. सद्या मी व प्रतिवादी क्र.३ एकाच घरात वेगवेगळे रहातो. आमच्यामध्ये कामापुरते बोलणे चालणे होते. साक्षीदार सांगतो तो प्रतिवादी क्र.२/अ सोबत रहातो. मला तिचा पुरावा नोंदवण्यास अडचण नव्हती. प्रतिवादी क्र.२/अ चालू फिरू शकत नाही. तिचे आजरोजी वय ८० वर्षे आहे.

**१९.** प्रतिवादी क्र.४ सुट्टीच्या दिवशी गावी येत असतो. मी प्रतिवादी क्र.४ कडे जास्त जात नाही. माझे वडील हयात असताना घरामध्ये खरेदीपत्राच्या १५ ते २० दिवस अगोदर चर्चा झाली नव्हती. मी मयत प्रतिवादी क्र.२ चा त्यांच्या हयातीत आदर करत होतो. सर्वसाधारणपणे घरातील मोठया व्यवहारास आई वडीलांची संमती घेतात. मयत प्रतिवादी क्र.२ ची १९९० साली प्रकृती चांगली होती. ते शेती करत होते.
प्रश्न–तुम्हाला तुमच्या वडीलांना खरेदीपत्रासाठी सोबत नेण्यासाठी काय अडचण होती?
उत्तर–मी व भावाने खरेदीपत्र केल्यामुळे वडीलांना सोबत नेले नव्हते.

**२०.** खरेदीपत्रापर्यंत वादी व आमच्यातील संबंध चांगले होते.
प्रश्न–तुम्ही भावाकडे त्याला कशासाठी कर्ज हवे आहे याची चौकशी केली होती काय?
उत्तर–त्याने पाईपलाईनसाठी पैसे हवे असल्याचे सांगितल्यामुळे खरेदीपत्र केले होते.

**२१.** माझ्याकडे खरेदीपत्रातील रक्कम उपलब्ध होती हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा

नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला कधीही खरेदीपत्रातील रक्कम दिलेली नसून त्याने स्विकारलेली नाही. वादीकडे ५ ते ६ एकर जमीन आहे. आज रोजी त्याच्या घरात ३ व्यक्ती आहेत. पुर्वी केवळ दत्तक घेणारी आई होती. वादी त्यातून भात, नाचणा गवताचे पिक घेतो. मला व वादीला पुर्वीपासून कोणतेही व्यसन नाही. वादी हा सधन कुटुंबातील आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला दावा मिळकतीची विक्री करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती.

**२२**. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी त्यांच्या लेखी कैफियतीबाबत माहिती घेतली आहे. आमच्यामध्ये दाव्याबाबत घरामध्ये जास्त चर्चा होत नव्हती. मी त्यांना त्यांचे लेखी म्हणणे देण्यासाठी सर्व माहिती व कागदपत्रे पुरवली आहेत. वादीने माझ्यावरती या न्यायालयात फौजदारी प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने या दाव्यासंबंधी माझ्यावरती ती तक्रार केलेली आहे. वादीने माझ्या विरोधात गट क्र.५१/अ च्या वादाबाबत फैाजदारी तक्रार केली आहे. हा दावा गट क्र. ५१/अ व ब च्या मिळकती बाबत आहे.

**२३**. हे म्हणणे खरे नाही की, मी व इतर प्रतिवादींनी दावा मिळकतीचे मालक नसून देखील दि.०५.०४.२००६ रोजी खोटे वाटणीपत्र केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व इतर प्रतिवादींनी जाणिवपूर्वक दावा मिळकतीबाबत वाद केला नाही. आमच्यामध्ये त्यावेळी झालेल्या भांडणाबाबत आम्ही एकमेकांविरोधात पोलीसांकडे तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत लुबाडण्यासाठी आम्ही आमच्यात भांडणे झाल्यामुळे वाटण्या केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादातील खरेदीपत्राचा स्टॅम्प वादीने आणलेला नसून त्यावरती त्याची स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीची मिळकत बळकावण्यासाठी आम्ही संगनमत करून त्याच्या अपरोक्ष खोटे खरेदीपत्र केले आहे.

**२४**. हे म्हणणे खरे नाही की, वादी व माझ्या जन्मामध्ये ३ ते ४ वर्षाचे अंतर आहे. मी दाखल करतो असे मान्य केलेल्या आधार कार्ड आणि वादीतर्फे दाखल केलेल्या शाळेच्या दाखल्या व्यतिरिक्त माझ्या जन्माबाबतचा इतर कागदोपत्री पुरावा हजर करणार नाही.

प्रश्न–तुम्ही इतर कोणताही पुरावा नसल्यामुळे तुमच्या जन्माचा पुरावा हजर करणार नाहीत?

उत्तर–माझ्या जन्माची नोंद नसल्यामुळे मी पुरावा सादर करू शकत नाही.

**२५.** हे म्हणणे खरे नाही की, कथीत खरेदीपत्रावरील साक्षीदार दत्तात्रय देसाई हा खरेदीपत्र करतेवेळी सज्ञान नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जन्माची ग्रामपंचायतीमध्ये दि.११.०७.१९७३ अशी जन्म नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी लेखी केफियतीसह नि.क्र.७८ च्या यादीसोबत अ.क्र. १ ते १०१ वरती संबंधीत अधिका–यांशी संगनमत करून खोटे व बनावट कागदपत्रे दाखल केली आहेत. माझे प्रतिवादी क्र.२/ब सोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही दावा मिळकतीचा खरेदीपत्राने कायदेशीर मालक नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने कोणतेही खरेदीपत्र करून दिलेले नसल्यामुळे मी दावा मिळकतीचा मालक नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजही दावा मिळकतीचा ताबा वादीकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, कथीत खरेदीपत्रावेळी मी सज्ञान नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा व बेकायदेशीर आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २३.०२.२०२६.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.